| | प्रसिद्धिपत्रक | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,<br>पुणे-४११००६ | पुणे शहर वाहतूक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE |

जा.क्र./पोउआ/वाह/ ४४०० /२०२४ पुणे दिनांक २२/०६/२०२४

पुणे शहरातील लष्कर वाहतूक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी रोहिदास पवार, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, लष्कर वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. सदर ठिकाणी यापर्वी काही पार्किंग संदर्भातीस आदेश असतील ते रद्द करण्यात येत आहे.

**लष्कर वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

१) ट्रायलक चौक पासून मुफ्ती फौज चौक दरम्यान सार्वजनिक रस्त्याच्या दक्षिण बाजुकडील २१४२,कावेडीया हॉस्पीटल ते २१५०,न्यु बालाजी ट्रेडर्स पर्यंत तसेच उत्तर बाजुस बंगलोर कॅफे ते २१३०,मणियार क्लिनिक पर्यंत सदर भागात पी.-१,पी-२ दुचाकी वाहनांना पार्किग करण्यात येत आहे.

२) मुफ्ती चौक ते चुडामण तालीम चौक या दरम्यान सार्वजनिक रस्त्याच्या दक्षिण बाजुकडील क्लासिक स्केअर बिल्डिंग, शॉप नं.५,रॉयल टच येथून ते क्लासिक स्केअर बिल्डिंग शॉप नं.६ आणि ७, लाईफकेअर जेनेरिक प्लस फार्मेस मेडीकल दुकानापर्यंत तसेच उत्तर बाजुकडील कल्पतरु अपार्टमेंट मॉर्डन डेअरी फार्म पासून ते न्युयॉर्क वाईन्स या दुकानापर्यंत सदर भागात पी.-१,पी-२ दुचाकी वाहनांना पार्किग करण्यात येत आहे.

३) मुफ्ती चौक ते चुडामण तालीम चौक या दरम्यान सार्वजनिक रस्त्याच्या दक्षिण बाजुकडील ७४६,भवानी पेठ,येथील कुमार प्रिमियर बिल्डिंग रत्नराज ज्वेलर्स,शॉप नं. २ ते ७४५, भवानी पेठ,निता हाऊस को ऑप हौसिंग सोसायटी चंदन ड्रग्ज स्टोअर्स पर्यंत चारचाकी वाहनांना समांतर पार्किग करण्यात येत आहे.

४) मुफ्ती चौक ते चुडामण तालीम चौक या दरम्यान सार्वजनिक रस्त्याच्या दक्षिण बाजुकडील स्वयंम क्लिनिक ते अल खलिफा टुर्स अॅन्ड ट्रॅव्हलर्स इंडिया प्रा. लिमि. ७३६ भवानी पेठ,पुणे पर्यत दुचाकी वाहनांना पार्किग करण्यात येत आहे.

५) मुफ्ती चौक ते चुडामण तालीम चौक या दरम्यान सार्वजनिक रस्त्याच्या उत्तर बाजुकडील कल्पतरु अपार्टमेंट न्युयॉर्क वाईन शॉप पासून ते दंत वेदना मदत क्रेंद ७७४,भवानी पेठ,पुणे सदर भागात नो पार्किंग करण्यात येत आहे.

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक –२३/६/२०२४ ते दिनांक – ७/७/२०२४ पर्यंत लेखी स्वरुपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यांवश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

(रोहिदास पवार)
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

प्रति,

१) **जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- **२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – ३,** पुणे शहर.

३) **पोलीस निरिक्षक, प्रेसरुम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४) **प्रभारी अधिकारी लष्कर** वाहतुक विभाग, पुणे शहर.
२/- **सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार / प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करून, त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी तसेच अंतिम प्रेसनोट सादर करावी.**

५) **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/-सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / व्टिटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

६) **पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.